# नगर परिषद कार्यालय,मलकापूर

**स्थायी समिती सभा दिनांक 29/12/2021 चे कार्यवृत्त**

मा अध्यक्ष नगर परिषद,मलकापूर यांची नोटीस क्रं.नपम/अध्यक्ष/सभा/3181/2021 दि.21/12/2021नुसार न.प.ची स्थायी समिती सभा आज दि.29/12/2021 ला बोलविण्यात आली होती.सभेसाठी आवश्यक असणारी गणपूर्ती झाल्यावर मा.सभापती यांचे आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

1. **बांधकाम समितीची दिनांक 17/06/2021 रोजी झालेल्या व पाणी पुरवठा समितीच्या दि. 30/04/2021 दिनांक 07/07/2021 व दिनांक 29/09/2021 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तास मान्यता देणे.**

बांधकाम समिती सभा दिनांक 17/06/2021 ला झाली असून पाणी पुरवठा समितीच्या दिनांक 30/04/2021,दिनांक 07/07/2021 व दिनांक 29/09/2021 रोजी सभा झालेल्या आहेत.नमुद केलेल्या बांधकाम समिती व पाणी पुरवठा समितीच्या सभेत वेळेवरचा एकही विषय नसून सभेचे कार्यवृत्त वाचून दाखविण्यात आले.

ठरविण्यात येते की, दिनांक 17/06/2021 रोजी बांधकाम समितीच्या सभेस व दिनांक 30/04/202,दिनांक 07/07/2021 व दिनांक 29/09/2021 रोजी पाणी पुरवठा समितीच्या झालेल्या सभांचा कार्यवृत्त कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- अनिल शिवरतन गांधी
अनुमोदक :- सन्नाउल्लाखा रफिउल्लाखा जमादार

ठराव सर्वानुमते मंजूर

2. **Income Tax / GST व TDS तसेच कर्मचाऱ्यांचे ITCT शासनखाती भरणे कामाकरीता CS ची नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणे.**

Income Tax / GST व TDS तसेच कर्मचाऱ्यांचे ITCT शासनखाती भरणे कामाकरीता CA ची नियुक्ती करणेबाबतच्या विषयाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणी वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,नगर परिषद कंत्राटदारांचे देयकातून कपात करण्यात आलेली FST व I.T.T.D.S. रक्कम शासन खाती रिटर्ण सहीत भरणे गरजेचे आहे.सदर कामाकरीता सनदी लेखापाल (CA) ची नियुक्ती करण्यात येते.

सन 2021-2022 या आर्थिक वर्षात सनदी लेखापाल यांचे नियुक्ती करावयाची आहे.सदर कामाकरीता सनदी लेखापाल यांना देण्यात येणारे देयक हे नगर परिषद निधी अंतर्गत करावे लागते.

वरील सर्वबाबींचा विचार करता सन 2021-2022 या आर्थिक वर्षात सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्यास व नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल यांचे देयक नगर परिषद निधी अंतर्गत प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मो.जाकीर मो.ईलीयास
अनुमोदक :- राजेंद्र वसंतराव वाडेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

**3. सन 2021-2022 वर्षाकरीता द्विनोंद लेखा पध्दतीने लेखे तयार करणेबाबत निर्णय घेणे.**

सन 2021-2022 वर्षाकरीता द्विनोंद लेखा पध्दतीने लेखे तयार करणेबाबतच्या विषयाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे सभेसमोर वाचन करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,नगर परिषद लेखा विभागाचे लेखे दुहेरी लेखा नोंद (Double Entry) पध्दतीने तयार करणेबाबत नगर विकास विभागाने दिनांक 18 नोव्हेंबर 2021 च्या परिपत्रकान्वये सुचित केले आहे.सदर कामाकरीता सनदी लेखापाल (CA) ची नियुक्ती करणे गरजेचे आहे. या कामाकरीता सनदी लेखापाल यांना देण्यात येणारे देयक हे नगर परिषद निधी अंतर्गत प्रदान करावयाचे आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता सन 2021-2022 वर्षाकरीता द्विनोंद लेखा पध्दतीने लेखे तयार करण्याकरीता तसेच नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल यांचे देयक नगर परिषद निधीतुन प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक :- अनिल शिवरतन गांधी

ठराव सर्वानुमते मंजूर

**4. न.प.निधी अंतर्गत आरोग्य विभागाकरीता खरेदीसाठी दै.अकोला दर्शन दिनांक 01/10/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निवीदा सुचनेनुसार प्राप्त दरपत्रकांना मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

न.प.निधी अतंर्गत आरोग्य विभागाकरीता खरेदीसाठी दै.अकोला दर्शन दिनांक 01/10/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निवीदा सुचनेनुसार प्राप्त दरपत्रकांना मान्यता देणेबाबतच्या विषयाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यातआली.सदर साहित्य खरेदी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सभेचे एकमत झाले.

ठरविण्यात येते की,सन 2021-2022 करीता दैनिक अकोला दर्शन दिनांक 01/10/2021 मध्ये प्रसिध्द आरोग्य विभागाच्या नगर परिषद निधी अंतर्गत तिन कामासाठी दर पत्रक मागविण्यात आले आहे.ते खालील प्रमाणे

1. **कामाचे नाव :- Floor clenning machine (नविन) खरेदी करणे.**

| अ.क्र. | निवीदा धारकांचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| 1 | **एस.एस.इंजिनियर्स,पुणे** | **1,75,500/-** |
| 2. | Flexo Clenn पुणे | 1,84,000/- |
| 3. | K.P.इंटरप्रायझेस,पुणे | 1,92,000/- |

2. **कामाचे नांव :- F.R.P.मुत्रीघर पुरवठा करणे.**

| अ.क्र. | निवीदा धारकांचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| 1. | FlexoClenn पुणे | 70,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | एस.एस.इंजिनियर्स पुणे | MAIL | 57,500/- |
| | | FMAIL | 60,500/- |
| 3. | K.P. इंटरप्रायझेस पुणे | MAIL | 66,500/- |
| | | FMAIL | 67,500/- |

3. **कामाचे नांव :- Grass Cutter Machine खरेदी करणे**

| अ.क्र. | निवीदा धारकांचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| 1 | **एस.एस.इंजिनियर्स,पुणे** | 60,000/- |
| 2. | Flexo Clenn पुणे | 67,500/- |
| 3. | K.P.इंटरप्रायझेस,पुणे | 71,000/- |

वरील सर्वबाबीचा विचार करता तसेच आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालावरुन असे निदर्शनास येते की, एस.एस.इंजिनियर्स,पुणे यांचे दर सर्वात कमी असल्याने कमी दरांच्या एस.एस.इंजिनियर्स,पुर्ण यांच्या निवीदांना तसेच सदरचे काम न.प.निधीतून करण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी प्रदान करीत आहे.

सुचक :- रशिद खॉ युसुफखॉ जमादा

अनुमोदक :- अनिल शिवरतन गांधी

ठराव सर्वानुमते मंजूर

5. **प्रभाग 14 मध्ये ज्ञानेश्वर नगर मधील हनुमान मंदीराजवळील विहिरीची दुरुस्ती करुन जाळी बसविणे.**

प्रभाग 14 मध्ये ज्ञानेश्वर नगर मधील हनुमान मंदीराजवळील विहिरीची दुरुस्ती करुन जाळी बसविण्याबाबतच्या कामाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,प्रभाग क्र.14 संत ज्ञानेश्वर नगरमध्ये हनुमान मंदीराजवळ जुनी विहीर असून त्याचा उपयोग त्या भागातील नागरीक घेत असतात.सदर विहीरीचे बांधकाम हे जिर्ण झालेले असून आवश्यक त्या ठिकाणी बांधकाम करुन प्लॉस्टर करणे आवश्यक आहे.तसेच सदर जागी नेहमी वर्दळ असल्यामुळे विहीरीचे बांधकाम करुन त्यावर लोखंडी जाळी बसविणे आवश्यक आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता प्रभाग 14 मध्ये ज्ञानेश्वर नगर मधील हनुमान मंदीराजवळील वहिरीची दुरुस्ती करुन जाळी बसविण्यास तसेच सदरचे काम न.प.निधीतून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक :- सौ.छाया शंकर पाटील

ठराव सर्वानमुते मंजूर

6. **मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत दै.नवभारत दिनांक 21/10/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या ई-निवीदा सुचनेनुसार कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत दै.नवभारत दिनांक 21/10/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निवीदा सुचनेनुसार कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबतच्या विषयाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत दै.नवभारत दिनांक 21/10/2021 मध्ये प्रसध्दि झालेल्या निवीदां सुचने नुसार विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या कमी दराच्या निवीदा खालील प्रमाणे आहे.

कामाचे नांव :- दादामल गुरुबानी यांचे घरापासून ते खत्री यांचे घरापर्यत रस्ता बांधकाम करणे
(अंदाजपत्रकीय रक्कम 7.98 लक्ष)

| अ.क्र. | निवीदाधारकाचे नांव | दर |
|---|---|---|
| **1.** | **अक्षय राजकुमार भंसाली** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| 2. | शिवम प्रमोद डवले | 3% जास्त दराने |
| 3. | राजेंद्र मोतीसींग नाईक | 2 % जास्त दराने |

वरील सर्वबाबींचा विचार करता प्राप्त कमी दरांच्या निवीदांपैकी सर्वात कमी दर अनु.क्र.1 अक्षय राजकुमार भंसाली यांची असल्याचा अहवाल नगर अभियंता,बांधकाम विभाग यांनी सादर केला आहे. त्यानुसार हि सभा अक्षय राजकुमार भंसाली यांची कमी दराच्या निवीदेस मान्यता देत आहे.

सुचक :- राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक :- सन्नाउल्लाखा रफिउल्लाखा जमादार

ठराव सर्वानुमते मंजूर

**7. सन शहरातील सन 2022-2023 वर्षामध्ये शहरातील महापुरुषांच्या पुतळयांना रंगरंगोटी करणेबाबत च्या येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

सन शहरातील सन 2022-2023 वर्षामध्ये शहरातील महापुरुषांच्या पुतळयांना रंगरंगोटी करणेबाबतच्या येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबतच्या विषयाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.चर्चेत श्री राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सहभाग घेत.शहरातील

दरवर्षी शहरात महापुरुषांची पुण्यतिथी/जयंती निमीत्य आवश्यकतेनुसार पुतळयांची तसेच पुतळयाच्या आजूबाजूच्या परिसराची रंगरंगोटीचे काम नगर परिषद मार्फत करण्यात येते.मलकापूर शहरातील पुतळे (1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा,भिमनगर ,(2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा,रेल्वे स्टेशनजवळ (3) पंत नगर मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा(4) छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा (शिवाजी नगर व बाजीप्रभू नगर, (5) डॉ.सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा (तहसिल चौक),(6) संत गाडगेबाबा पुतळा (बुलडाणा रोड) , (7) शहीद अ.हमीद चौकातील स्तंभ, (8) शहीद संजयसिंह राजूत यांचे शहीद स्मारक,(9) सार्वजनिक वाचनालयाचे आवारातील जयस्तंभ,(10) स्टेशन रोडवरील हुतात्मा पुंडलिक स्मारक

तसेच नगर परिषद हद्दीतील स्मारके व पुतळे इत्यादि या प्रमाणे दरवर्षी रंगरंगोटीचे काम करण्यात येते.सन 2022-2023 करीता रंगरंगोटीच्या कामाकरीता वार्षीक दर पत्रकाच्या निवीदा मागवाव्या लागतील.

वरील सर्वबाबींचा विचार करता उपरोक्त स्मारके,व पुतळे यांना रंगरंगोटी करण्याच्या कामाकरीता सन 2022-2023 करीता वार्षीक दरपत्रक /निवीदा मार्गविण्यास तसेच सदरचे कामाकरिता येणारा खर्च न.प.निधीतून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक :- सन्नाउल्लाखा रफिउल्लाखा जमादा

ठराव सर्वानुमते मंजूर

**8. सन 2022-2023 करीता गणेशोत्सव,दुर्गात्सव व इतर उत्सवाकरीता लाकडी बॅरेकेटींग व कनाथ लावण्याबाबत येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

सन 2022-2023 करीता गणेशोत्सव,दुर्गात्सव व इतर उत्सवाकरीता लाकडी बॅरेकेटींग व कनाथ लावण्याबाबत येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबतच्या विषयाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,शहरात दरवर्षी गणेशोत्सव,दुर्गा उत्सव व इतर उत्सवाकरीता नगर परिषद मार्फत उपाययोजना कराव्या लागतात.या उत्सवा दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन मलकापूर यांचेकडून पत्र व सुचना प्राप्त होतात.त्यानुसार आवश्यक त्या टिकाणी बॅरेकेटींग,कनात बांधणे,रस्ते दुरुस्तीची कामे करावी लागतात.याकरीता नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्याकरीता सन 2022-2023 या वर्षाकरीता वार्षीक दर मागवावे लागतील.

वरील सर्वबाबींचा विचार करता सन 2022-2023 करीता गणेशोत्सव,दुर्गात्सव व इतर उत्सवाकरीता लाकडी बॅरेकेटींग व कनाथ लावण्या करीता येणाऱ्या खर्चास व सदरचे काम न.प.निधीतून करण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

सुचक :- मो.जाकीर मो.ईलीयास

अनुमोदक :- अनिल शिवरतन गांधी

ठराव सर्वानुमते मंजूर

**9. सन 2021-2022 करीता गणेशोत्सवाच्या वेळी बॅरेकेटींगच्या कामाकरीता झालेल्या खर्चास कार्योत्तर आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

सन 2021-2022 करीता गणेशोत्सवाच्या वेळी बॅरेकेटींगच्या कामाकरीता झालेल्या खर्चास कार्योत्तर आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबतच्या विषयाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.चर्चेत सन्नाउल्लाखा रफिउल्लाखा जमादार यांनी सहभाग घेतला व कोरोना काळात पैगंबर जयंतीची मिरवणूक काढण्यात आली

नसल्याचे सभेच्या निदर्शनास आणून दिले.यावर नगर अभियंता यांनी असे निदर्शनास आणून दिले की, निवीदा काढत असतांना गणेशोत्सव,दुर्गा उत्सव,शिवजयंती व पैगंबर जयंती या कामाच्या एकत्रीत निवीदा काढण्यात आल्या होत्या.परंतू गणेशोत्सवा करीताच बॅरेकेटींग बांधणे व सोडूण नेण्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

ठरविण्यात येते की,गणेशोत्सव,दुर्गा उत्सव आणि इतर धार्मिक उत्सवाच्या वेळी रहदारी बंद करण्यासाठी आवश्यक ठिकाणी लाकडी बॅरेकेटींग बांधणे व सोडणे वाहतूकच्या खर्चासह दै.खबरे शामतक दिनांक 24/04/2021 च्या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेप्रमाणे विहीत मुदतीत खालील प्रमाणे निवीदा प्राप्त झालेल्या आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **गणेशोत्सव** | **दुर्गा उत्सव** | **शिवजयंती** | **पैगंबर जयंती** |
| 1 | विजयकुमार सालवाणी | 1,41,000/- | 50,000/- | 1,42,000/- | 99,000/- |
| 2 | **मुश्ताक खान जब्बारखान** | **1,35,000/-** | **40,000/-** | **1,40,000/-** | **95,000/-** |
| 3 | वाजीदउल्लाह कादरी | 1,39,000/- | 49,000/- | 1,45,000/- | 99,000/- |

वरील सर्वबाबींचा विचार करता नगर अभियंता,बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या उपरोक्त तुलनात्मक अहवालाप्रमाणे प्राप्त दरापैकी सर्वात कमी दर **अनु. क्र.2 मुश्ताकखान जब्बार खान** यांची कमी दराची निवीदा हि सभा मंजूर करीत आहे.

सुचक :- राजेंद्र वसंतराव वाडेकर
अनुमोदक :- रशिदखा युसुफखा जमादार

ठराव सर्वानुमते मंजूर

10. **पाणी पुरवठा विभागाकरीता निवीदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार आलेल्या कमी दराच्या निवीदांना मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

पाणी पुरवठा विभागाकरीता निवीदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार आलेल्या कमी दराच्या निवीदांना मान्यता देणेबाबतच्या विषयाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,दै.सत्य प्रतिमा दिनांक 01/11/2021 च्या अंकात पाणी पुरवठा विभागाकरीता सहा कामाकरीता निवीदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.त्यानुसार विहीत मुदतीत कमी दराच्या निवीदा प्राप्त झालेल्या आहेत.त्या खालील प्रमाणे.

1. **कामाचे नांव :- धुपेश्वर पंपीग स्टेशनसाठी एक लोखंडी कपाट,खुर्च्या,दोन टेबल चा पुरवठा करणे.**

| अ.क्र. | कत्राटदाराचे नांव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1. | **अविनाश जामोद** | 14,300/- |
| 2. | अक्षय भंसाली | 15,600/- |
| 3. | मुस्ताकखाँ जब्बारखाँ | 17,000/- |

पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालानुसार **अविनाश जामोदे यांचे दर सर्वात कमी** (14,300/-) असल्याचे नमुद केले आहे.

2. **कामाचे नांव :- नळगंगा जॅकवेलसाठी व्हीटी पंपाकरीता बॉल असेब्ली व इतर पार्ट दुरुस्ती करणे.**

| अ.क्र. | कत्राटदाराचे नांव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1. | **ढवळे ईलेक्ट्रीकल** | 1,14,200/- |
| 2. | ढवळे इलेक्टो | 1,17,110/- |
| 3. | ओके इलेक्ट्रीकल | 1,18,500/- |

पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालानुसार **ढवळे इलेक्ट्रीकल यांचे दर सर्वात कमी** (1,14,200/-) असल्याचे नमुद केले आहे.

**3. कामाचे नांव :- जलशुध्दीकरण केंद्रासाठी 15 HP चे स्टार्टर,केबल,HDPE 3 इंची NRV साहित्या चा पुरवठा करणे.**

| अ.क्र. | कत्राटदाराचे नांव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1. | ढवळे ईलेक्ट्रीकल चिखली | 29,400/- |
| 2. | ओके इलेक्ट्रीकल,मलकापूर | 29,300/- |
| 3. | **श्री.इंरीग्रेशन,मलकापूर** | **26,300/-** |

पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालानुसार **श्री.इंरीग्रेशन,मलकापूर यांचे दर सर्वात कमी** (26,300/-) असल्याचे नमुद केले आहे.

**4. कामाचे नांव :- धुपेश्वर जॅकवेल करीता DO रॉड व रबरी ग्लोज व सुरक्षात्मक साहित्य तसेच इतर पाने,पेजकच इत्यादि साहित्याचा पुरवठा करणे.**

| अ.क्र. | कत्राटदाराचे नांव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1. | **श्री.इंरीग्रेशन,मलकापूर** | 2150/- |
| 2. | ढवळे ईलेक्ट्रीकल चिखली | 3090/- |
| 3. | ओके इलेक्ट्रीकल,मलकापूर | 2470/- |

पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालानुसार **श्री.इंरीग्रेशन,मलकापूर यांचे दर सर्वात कमी** (2150/-) असल्याचे नमुद केले आहे.

**5. कामाचे नांव :- पाणी पुरवठाच्या जलशुध्दीकरण केंद्रा पीएसी पावडर टाकण्याबाबत यंत्रणा उभारणेसाठी साहित्याचा पुरवठा करणे.**

| अ.क्र. | कत्राटदाराचे नांव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1. | **अविनाश जामोदे** | **24,000/-** |
| 2. | अक्षय भंसाली | 25,000/- |
| 3. | मुस्ताकखॉं जब्बारखॉं | 26,000/- |

पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालानुसार **अविनाश जामोदे यांचे दर सर्वात कमी (24,000/-)** असल्याचे नमुद केले आहे.

**6. कामाचे नांव :- पाणी पुरवठा विभागाअंतर्गत लिकेंज दुरुस्तीच्या कामाकरीता सिमेंट रोड फोडण्या करीता ब्रेकर मशीन पुरवठा करणे.**

| अ.क्र. | कत्राटदाराचे नांव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1. | **श्री.इंरीग्रेशन,मलकापूर** | **40,000/-** |
| 2. | ढवळे ईलेक्ट्रीकल चिखली | 42,000/- |
| 3. | ओके इलेक्ट्रीकल,मलकापूर | 45,000/- |

पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालानुसार **श्री.इंरीग्रेशन,मलकापूर यांचे दर सर्वात कमी** (40,000/-) असल्याचे नमुद केले आहे.

पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालानुसार काम क्रमांक 1 व 5 करीता अविनाश जामोदे,काम क्रमांक 2 करीता ढवळे ईलेक्ट्रीकल,यांचे दर काम क्रमांक 2,4 व 6 करीता श्री.इरिग्रेशन,मलकापूर यांचे दर सर्वात कमी आहेत.

वरील सर्वबाबींचा विचार करता काम क्रमांक 1 व 5 करीता अविनाश जामोदे यांची तर काम क्रमांक 2 करीता ढवळे ईलेक्ट्रीकल यांची तर काम क्रमांक 2,4 व 6 करीता श्री इंरिग्रेशन,मलकापूर यांच्या कमी दराच्या निवीदांना हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- अनिल शिवरतन गांधी

अनुमोदक :- मो.जाकीर मो.ईलियास

ठराव सर्वानुमते मंजूर

स्थायी समिती सभेसमोर 1 ते 10 विषयांचे कामकाज पूर्ण झाल्याने उपस्थित स्थायी समितीचे

न.प. स्थायी समिती सभा



फॉर्म बी

नियम ४ पहा

सकाळी- ११.०० वा.

# हजेरी बुक

सभेची तारीख २९/१२/२०२१

| सर्वश्री सदस्यांचे नांव | | सही / अंगठा |
|---|---|---|
| (१) हरीश महादेवसिंह रावळ | अध्यक्ष | [signature] |
| (२) रशीदखॉं जुल्फकारखॉं जमादार | उपाध्यक्ष | [signature] |
| (३) सौ. पुजा गोपाल शाही | सदस्य | गैरहजर |
| (४) मो. जाकीर मो. ईलियास | -॥- | [signature] |
| (५) अनिल शिवरतन गांधी | -॥- | [signature] |
| (६) सलमाबानो शे. इम्रान | -॥- | गैरहजर |
| (७) सौ. छाया शंकर पाटील | -॥- | सौ. छाया पाटील |
| (८) राजेंद्र वसंतराव वाडेकर | -॥- | [signature] |
| (९) सनाउल्लाखॉं रफिउल्लाखॉं | -॥- | [signature] |
| (१०) सौ. मंगला श्रीकृष्ण पाटील | -॥- | [signature] |